# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

## २०१५-२०१६

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंबधीचा

## पहिला अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक       जुलै २०१५ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
जुलै, २०१५



विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
२०१५-२०१६
(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)
गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंबधीचा
पहिला अहवाल

## विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

(१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(४) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(५) श्री. महेश चौघुले, वि.स.स.

(६) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

(९) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.

(१०) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(११) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.

(१२) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(१३) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

(१४) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.

(१५) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे २०१५ व दिनांक २१ मे २०१५ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.





## विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती
## (सन २०१३-२०१४)

**समिती प्रमुख**

(१) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. अशोक जाधव, वि.स.स.

(३) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.

(४) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

(५) श्री. शंकरराव गडाख, वि.स.स.

(६) श्री. गणपत गायकवाड, वि.स.स.

(७) श्री. पृथ्वीराज साठे, वि.स.स.

(८) श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.

(९) श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

(११) श्री. संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

(१२) श्री. विजय सावंत, वि.प.स.

(१३) श्री. मुझफ्फर हुसेन, वि.प.स.

(१४) श्री. राम पंडागळे, वि.प.स.

(१५) श्री. भगवानराव साळुंखे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव,

(३) श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव,

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका


| अनु-क्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | सात |
| २ | अहवाल | २ |
| ३ | परिशिष्ट "एक" (जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथील कार्यालयास दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती). | १४ |
| ४ | परिशिष्ट "दोन" (दिनांक १० जून २०१५ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती). | १८ |
| ५ | परिशिष्ट "तीन" (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त). | ३९ |




## प्रस्तावना

मी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा (२०१५-२०१६) पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या वर्षासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती दिनांक २२ मे २०१५ रोजी गठीत झाली.

विधानसभा नियमावलीतील नियम २३८ अन्वये या समितीकडे खालीलप्रमाणे कामे सोपविण्यात आली आहेत :-

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परीक्षण करणे, आणि राज्य शासनाने, त्यासंबंधात काय उपाययोजना करावी या विषयाची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे;

(दोन) राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक आणि निम सरकारी संस्था यातील नेमणुका धरून) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे;

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारणतः विचारविनिमय करणे आणि दोन्ही सभागृहांना त्याबाबतचा अहवाल देणे;

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे;

(पाच) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

सन २०१३-२०१४ च्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांसंदर्भात सदर कार्यालयास दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी भेट देऊन तेथील संबंधित अधिका-यांशी चर्चा केली. समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात पुरविलेल्या लेखी माहितीच्या आधारे व समितीने संबंधित कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १० जून २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे प्रधान सचिव, महसूल विभाग व सामाजिक न्याय विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांची साक्ष घेतली.

उक्त कार्यालयाने समितीला पुरविलेली लेखी माहिती व समितीच्या प्रत्यक्ष भेटीच्या वेळी मिळालेली माहिती आणि विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी पुरविलेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्या संदर्भातील आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

अहवालातील परिशिष्ट "एक" व "दोन" मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट "तीन" मध्ये समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त समाविष्ट करण्यात आले आहे. समितीने दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी प्रारुप अहवालावर विचार करुन तो संमत केला.

जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी आणि प्रधान सचिव, महसूल विभाग व सामाजिक न्याय विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांनी साक्षीच्या वेळी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक २३ जुलै, २०१५.

**बाळासाहेब सानप,**
समिती प्रमुख,
विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती.



# अहवाल
## जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने पाठविलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिका-यांकडून विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांच्या संदर्भात माहिती घेतली.

समितीने, जिल्हाधिकारी कार्यालयात सन २०१०-२०११ या वर्षात अव्वल कारकूनाची १७३ पदे मंजूर असतांना १९१ पदे भरलेली आहेत. अव्वल कारकूनाची जास्तीची पदे व त्यांच्या पदोन्नतीचे निकष काय आहेत, सन २००८ नंतर अव्वल कारकून या पदातील किती उमेदवारांना पदोन्नती देण्यात आलेली आहे, अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गासाठी अव्वल कारकूनाची ६ पदे आरक्षित होती, त्यापैकी २ पदे भरली असून ४ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांसाठी जाहिरात दिली होती, परंतु उमेदवार न मिळाल्यामुळे ही पदे रिक्त आहेत. लिपिक संवर्गातील पदे अव्वल कारकूनासाठी पात्र असतात, परंतु त्या त्या वर्गातील ज्येष्ठतेप्रमाणे ते उमेदवार मिळाले नव्हते म्हणून ही पदे रिक्त आहेत. अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठी कनिष्ठ लिपिक या संवर्गातील किमान तीन वर्षांची सेवा असणे गरजेचे आहे. तसेच कर्मचा-यांची कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असता कामा नये. महसूल अर्हता परीक्षा पास असणे आवश्यक आहे. तसेच वयाची ४५ वर्षे पूर्ण होत नाहीत तोपर्यंत उमेदवार पात्र ठरत नाहीत. भटक्या जमाती "ब" प्रवर्गातील उमेदवारांना सन १९९२, १९९९, २००१, २००५, २०१० आणि २०१२ मध्ये पदोन्नती देण्यात आली होती. सन २००८ नंतर कारकून या पदावर कार्यरत असणा-या संबंधित २ उमेदवारांना पदोन्नती देण्यात आली होती, अशी माहिती समितीस देण्यात आली.

जिल्हाधिकारी यांनी पुढे असाही खुलासा केला की, पदांचे समायोजन झाले त्यावेळी कॅटेगरीमधील उमेदवारांची संख्या कमी जास्त झालेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात अव्वल कारकून या पदाची भरती प्रक्रिया सुरु आहे. भ.ज.(ब) प्रवर्गात जादा भरण्यात आलेली पदे ही शासन निर्णय दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ नुसार अंतर्गत परिवर्तनाने भरण्यात आलेली आहेत.

यावर विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या संवर्गातील उमेदवारांना पदोन्नती मिळण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देऊन उमेदवार तयार करावेत, जेणेकरुन विमुक्त जाती व भटक्या जमातीचे उमेदवार मिळू शकतील, असे समितीने सूचित केले.

समितीने जिल्ह्यात नोकरभरती करीत असतांना ती जिल्ह्यापुरती मर्यादित असते काय, अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी, संपूर्ण राज्यात एकाच तारखेला लेखी परीक्षा घेतली जाते. दिनांक ५ सप्टेंबर २००९ रोजी नोकरभरती झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यात आदिवासींचे आरक्षण २४ टक्के असून विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी आरक्षण ८ टक्के आहे. उर्वरित जिल्ह्यांत हे प्रमाण ११ टक्के आहे अशी माहिती दिली.

समितीने सन २००८ मध्ये निर्गमित झालेल्या शासन निर्णयात असे म्हटले आहे की, एखाद्या वर्गात जोपर्यंत १०० बिंदू नामावली पूर्ण होत नाही. तोपर्यंत पदांची अदलाबदल करता येत नाही अशी विचारणा केली असता, सहायक आयुक्त, (मागासवर्ग कक्ष) यांनी विदित केले की, सन २००८ मधील शासन निर्णय हा सरळसेवेतील लहान संवर्गासाठी होता. यामध्ये जर १२ पदे असतील तर रोटेशनप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसुचित जमातीला पदे दिली जातात. जर त्यापैकी उमेदवार मिळाला नाही तर पुढील पद भरले जाते. विमुक्त जमाती व भटक्या जमाती प्रवर्गात आंतरबदली करता येते. यामध्ये अनुसूचित जातीची जागा अनुसुचित जमातीला द्यावयाची असेल तर सन १९९४ च्या शासन निर्णयानुसार शासनाची परवानगी घ्यावी लागते.

बिंदू नामावली नोंदवहीचे अवलोकन केले असता समितीच्या असे निदर्शनास आले की, भटक्या जमाती “ब” प्रवर्गाला अधिक न्याय दिलेला आहे. त्यामुळे “क” आणि “ड” प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय झालेला आहे. विमुक्त जमाती “अ” प्रवर्गातील ४ उमेदवारांना पदोन्नती कधी दिली जाणार आहे, अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी सांगितले की पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे दुस-या प्रवर्गातील पात्र उमेदवार घेण्यात आले होते. त्यावेळी अंतर्गत बदलीच्या नियमान्वये ती पदे पदोन्नतीने भरलेली आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गट “अ”, “क” व “ड” मधील पात्र उमेदवार मिळाल्यानंतर संबंधित उमेदवारांना पदोन्नती दिली जाणार आहे.

समितीने, तलाठी संवर्गातील मंडल अधिकारी व तलाठी या पदांची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी समितीस विदित केले की, तलाठी संवर्गातील, मंडल अधिका-यांची एकूण ४० पदे मंजूर असून त्यापैकी ३८ पदे भरलेली आहेत. विमुक्त जाती “अ” प्रवर्गात १ पद पदोन्नतीसाठी मंजूर आहे. विमुक्त जाती “ब” प्रवर्गात १ पद पदोन्नतीसाठी मंजूर असून २ पदे पदोन्नतीने भरलेली आहेत. विमुक्त जाती “क” प्रवर्गात १ पद पदोन्नतीसाठी मंजूर आहे. विमुक्त जाती “ड” प्रवर्गात १ पद पदोन्नतीसाठी मंजूर असून ते भरलेले आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी एकूण तलाठी संवर्गाची ४ पदे पदोन्नतीची मंजूर असून फक्त ३ पदे पदोन्नतीने भरलेली आहेत. पदोन्नतीस पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे एक पद रिक्त आहे. तलाठी संवर्गात सरळसेवेची २३७ पदे मंजूर असून २२७ पदे भरलेली आहेत. त्यापैकी १० पदे रिक्त आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी तलाठी संवर्गाची एकूण १९ पदे सरळसेवेची मंजूर असून १८ पदे भरलेली आहेत. केवळ एकाच पदाचा अनुशेष



शिल्लक आहे. तीन उप विभाग नव्याने निर्माण झाल्याने त्यांचे समायोजन करताना उप विभाग देसाईगंज यांचेकडे ह्या एका पदाचा अनुशेष दिसून येतो. तथापि, रिक्त पद शिल्लक नसल्याने अनुशेष भरता आलेला नाही. जिल्हाधिका-यांनी पुढे असेही विदित केले की, कार्यालयात लिपिक टंकलेखकाची सरळसेवेची एकूण १५९ पदे मंजूर असून त्यापैकी १४१ पदे सरळसेवेने भरलेली आहेत. यामध्ये सरळसेवेची विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी आरक्षित असलेली १३ पदे भरलेली आहेत. लिपिक टंकलेखकाची २५ टक्के प्रमाणे पदोन्नतीची ५३ पदे मंजूर असून त्यापैकी ३० पदे भरलेली आहेत. विमुक्त जमाती, भटक्या जमातीकरिता एकूण ५ पदे असून त्यापैकी २ पदे २५ टक्के पदोन्नतीने भरलेली आहेत.

समितीने शिपाई संवर्गासाठी विमुक्त जाती “ब” मध्ये सरळसेवेची ३ पदे मंजूर असताना १० पदे भरलेली आहेत. शिपाई संवर्गासाठी विमुक्त जाती “क” मध्ये ४ पदे मंजूर असताना केवळ एकच पद भरलेले आहे. शिपायांची सरळसेवेने किती पदे भरली आहेत, त्यांची शैक्षणिक पात्रता काय आहे अशी विचारणा केली असता शिपाई पदासाठी इयत्ता चौथीची परीक्षा पास असणे आवश्यक आहे तर लिपिक पदासाठी इयत्ता दहावीची परीक्षा पास व एमएससीआयटीची परीक्षा पास असावी लागते. विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लिपिक पदासाठी पात्र असलेले शिपाई संवर्गातील ३ उमेदवार मिळाले, तथापि, २७ उमेदवारांकडे वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देता आली नाही असे समितीस विदित करण्यात आले.

समितीने, कार्यालयातील वर्ग-३ आणि वर्ग-४ ची पदे भरण्यासाठी कोणकोणत्या आणि किती वर्तमानपत्रात जाहिराती देण्यात येतात अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी माहिती दिली की, विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रे, दैनिक वर्तमानपत्र आणि माहिती व जनसंपर्क विभागाकडे ही जाहिरात प्रसिद्धीसाठी देण्यात येते. स्थानिक चार दैनिके आहेत आणि १४ साप्ताहिक आहेत. सन २०१०-२०११ मध्ये तलाठी व लिपिक-टंकलेखक संवर्गाची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यासाठी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१० रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सन २०१०-२०११ मध्ये तलाठी, लिपिक-टंकलेखक, वाहनचालक व शिपाई यांची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यासाठी दिनांक २१ सप्टेंबर २०११ रोजी व दिनांक १७ मार्च २०१२ रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सन २०१२-२०१३ मध्ये तलाठी, लिपिक-टंकलेखक, वाहनचालक व शिपाई यांची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यासाठी दिनांक ६ सप्टेंबर २०१२ रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. उपरोक्त जाहिरातीमध्ये त्या त्या वेळी रिक्त असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या रिक्त पदांचा समावेश करण्यात आला होता. जाहिरातीनुसार वर्षनिहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये तलाठी, लिपिक, वाहनचालक आणि शिपायांची पदे भरलेली आहेत.

यावर, जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित दैनिक किंवा साप्ताहिकाने शासनाच्या निकषांचे पालन केले पाहिजे यासंदर्भात योग्य ती दक्षता घेऊन लोकप्रिय असणा-या दैनिकांमध्ये पदांच्या बाबतीत जाहिराती दिल्या पाहिजेत, असे समितीने मत व्यक्त केले.

जिल्हाधिका-यांनी खुलासा केला की, कार्यालयातील बिंदू नामावली नोंदवह्या दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२ पर्यंत अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा निवड समिती सदस्य या नात्याने जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे दिनांक २८ डिसेंबर २०११, दिनांक ८ जून २०१२ आणि २० ऑक्टोबर २०१२ रोजी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांबाबतचे मासिक विवरण दर महिन्याला सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठविण्यात येते. विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांनी विमुक्त जाती व भटक्या जमातीतील कर्मचा-यांसाठी असलेल्या आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाची दिनांक ११ मार्च २०१३ रोजी तपासणी केलेली आहे. सर्वसाधारण व मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठीची १०० बिंदू नामावली नोंदवहीमध्ये सहाय्यक आयुक्तांनी कोणत्याही प्रकारची त्रुटी काढलेली नाही. परंतु, मागासवर्गीयांचे जे आरक्षण शिल्लक आहे ते भरण्यास निर्देशित केलेले आहे. वर्ग-३ मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचा-यांची संख्या ५० इतकी आहे. तसेच शिपाई पदातील नव्याने रूजू झालेल्या ५ उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाचा आदेश दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ रोजी नुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचा-यांच्या यापुढील वेतनवाढी ते जोपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयाला सादर करीत नाहीत, तोपर्यंतच्या कालावधीपर्यंत रोखण्यात आलेल्या आहेत.

जिल्हाधिका-यांनी पुढे माहिती दिली की, मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात "विशेष मागासवर्ग कक्ष" स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आलेला नाही. तथापि, विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी या कार्यालयाकडून वेळोवेळी निकाली काढल्या जातात. सद्य:स्थितीत विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी या कार्यालयामध्ये प्रलंबित नाहीत. "विशेष मागासवर्ग कक्ष" स्थापन करण्याबाबत आयुक्त, नागपूर विभाग यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. ५०० हून अधिक संख्या कर्मचारी वर्गाची असेल तर त्या कार्यालयात "मागासवर्ग कक्ष" स्थापन केला जातो. माननीय समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशानुसार एक महिन्याच्या आत "मागासवर्ग कक्षाची" स्थापना केली जाईल.

समितीने नगरपरिषद क्षेत्रात विशेष घटक योजनेंतर्गत कोणत्या योजना राबविल्या जातात, अशी विचारणा केली असता समितीस खालीलप्रमाणे माहिती मिळाली.



वडसा नगरपालिकेसाठी सन २००९-२०१० या वर्षाकरिता विशेष घटक योजनेसाठी ४० लाख रुपयांची तरतूद होती. गडचिरोली नगरपालिकेसाठी २५ लाख रुपयांची तरतूद होती. सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात २ कोटी १७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात ३ कोटी ८२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. ६०/४० याप्रमाणे दोन्ही नगरपालिकेला निधीचे वितरण करण्यात आले आहे. विशेष घटक योजनेंतर्गत नागरी दलित वस्ती सुधारणा शासन निर्णयाप्रमाणे नगर परिषद क्षेत्रात राबविल्या जातात. मात्र विशेष घटक योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांकरिता स्वतंत्र योजना कार्यान्वित नाही.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील किती लोकांना घरकुले मंजूर केली आहेत अशी विचारणा केली असता, समाजकल्याण संचालकांतर्फे माहिती देण्यात आली की, गेल्या तीन वर्षात विमुक्त जाती, भटक्या जमाती संवर्गातील ९८४ लोकांना घरकुले मंजूर केलेली आहेत. त्यापैकी विमुक्त जातीसाठी ७८२ घरकुले, भटक्या जमातीसाठी २०२ घरकुले अशी एकूण ९८४ घरकुले मंजूर केलेली आहेत. इंदिरा आवास योजनेमार्फत ज्यांना राहण्यासाठी जागा नसेल, ज्यांची कच्ची घरे असतील, अशा लोकांसाठी प्रतिक्षा यादी तयार केली जाते असे निकष घरकुले मंजूर करण्यासाठी लावले जातात.

समितीने, नवीन योजनेनुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लोकांना लाभ कसा देता येईल याचाही विचार करावा असे सुचविले असता सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी असे विदित केले की, जिल्हा नियोजन व विकास समितीमध्ये याबाबत निश्चितपणे विचार करण्यात येतो. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून ४ योजना राबविल्या जातात. भारत सरकारची विमुक्त जमातीमधील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती दिली जाते. आयटीआय मधील विद्यार्थ्यांना विद्यावेतन, व्यावसायिक शिक्षण, वसतिगृह संलग्न निर्वाहभत्ता अशा प्रकारच्या योजना राबविल्या जातात. आठवी ते दहावी मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये १०० प्रमाणे तीन महिन्यातून एकदा शिष्यवृत्तीची रक्कम दिली जाते.

समितीने तांडा/वस्ती तसेच प्रशासकीय मान्यता व लोकसंख्येचे प्रमाण याबाबत माहिती विचारली असता सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडून माहिती मिळाली की, नॉन प्लॅनमधून तांडा वस्तीसाठी निधी मिळतो. सन २०१०-२०११ मध्ये २० लाख रुपयांचा निधी मिळाला होता. सन २०११-२०१२ मध्ये ११ लाख रुपयांचा निधी मिळाला होता. सन २०१२-२०१३ मध्ये २४ लाख रुपयांचा निधी मिळाला होता, जिल्ह्यामध्ये एकूण २१ तांडे आहेत. तांडा वस्ती अंतर्गत पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिले जाते. प्रामुख्याने सिमेंट रस्ते आणि नाल्याची कामे हाती घेतली जातात. प्रशासकीय कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून मान्यता दिली जाते. २१ तांड्यांची लोकसंख्या सुमारे ३२०० च्या आसपास आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीची १५० च्या आत लोकसंख्या असलेल्या तांड्याची संख्या खूप जास्त आहे आणि १५० च्या वर लोकसंख्या असलेल्या तांड्याची संख्या अवघी दोन ते तीन आहे. ५० ते १५० पर्यंत लोकसंख्या असलेल्या तांड्यासाठी ६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. १५० पेक्षा जास्त लोकसंख्या असणा-या तांड्यासाठी १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

समितीने, निवासी शाळा व निवासी शाळेतील भरतीच्या संदर्भात विचारले असता जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी ११ निवासी शाळा आहेत. यामध्ये ७ प्राथमिक, ३ माध्यमिक आणि १ कनिष्ठ महाविद्यालय आहे. यासंदर्भातील सर्व अधिकार प्रादेशिक उप आयुक्त, नागपूर यांना दिलेले आहेत असे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी सांगितले.

समितीने विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी असलेल्या यशवंत ग्रामसमृद्धी योजनेबाबत विचारले असता दिनांक २७ डिसेंबर, २०११ नुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील लोकांसाठी रमाईच्या धर्तीवर २६९ चौरस फुट घर बांधून द्यावयाचे आहे. एका लाभार्थ्यांला ५ गुंठे जागा दिली जाते. प्रत्येक जिल्ह्यात २० लाभार्थ्यांसाठी ५ एकर परिसरात एक वसाहत निर्माण करावयाची आहे. या योजनेत लाभार्थी हा विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील असला पाहिजे. गावोगावी भटकंती करुन उपजिविका करणारा असला पाहिजे. कुटुंबाचे मालकीचे घर नसावे. तो बेघर असला पाहिजे. संबंधित लाभार्थी हा सहा महिने गावातील रहिवासी असला पाहिजे आणि दारिद्रय रेषेचा आधार घेऊन जिल्ह्यातील चार गावांची निवड करण्यात आली होती. परंतु, पात्रतेचा निकष पूर्ण करणारे लाभार्थी मिळाले नाहीत. यासंदर्भात माननीय जिल्हाधिकारी आणि माननीय आयुक्तांनी देखील आढावा घेतलेला आहे. यासंदर्भात झालेल्या बैठकीत हे निकष बदलण्याबाबत सर्वांचे एकमत झाले होते आणि इंदिरा आवास योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील लोकांना घरकूल दिले जावे असे ठरले होते. अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी दिली.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी घेतलेल्या बैठकीच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित लेखी माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० जून, २०१५ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती. सदर बैठकीत जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी वृंदाची रचना तसेच कार्यालयात एकूण किती कर्मचारी आहेत. त्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी असलेले आरक्षण व पदोन्नती याबाबतची सद्य:स्थिती विचारली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २००२ मध्ये गडचिरोली जिल्ह्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांची संख्या जास्त असल्यामुळे शासनाने अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांसाठी आरक्षणाची टक्केवारी वाढविण्याचा निर्णय घेतला. पदोन्नतीच्या निकषानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांना पदोन्नती दिली जाते. उमेदवारांना पदोन्नती मिळावी याकरिता समितीने कार्यालयास दिलेल्या भेटीच्यावेळी अशा उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबत सूचना केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधनी, अमरावती येथे संबंधित उमेदवारांना प्रशिक्षणासाठी पाठविले होते. त्यात ९७ लिपिक व ६६ अव्वल कारकुनांचा समावेश होता. प्रशिक्षण दिल्यानंतर संबंधित



उमेदवार विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाला तर त्याला पदोन्नती देण्याची कार्यवाही केली जात असते पदोन्नती देताना ज्या उमेदवाराचे वय ४५ वर्षे पूर्ण झालेले आहे, अशा उमेदवारांना परीक्षा देण्यापासून सूट दिलेली आहे. शिपाई आणि लिपिक प्रवर्गात तरुण विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते. अशा उमेदवारांना पदोन्नती देताना विभागीय परीक्षा पास कराव्या लागतात. सद्य:स्थितीत सरळसेवेने पदे भरण्यात आलेली आहेत. फक्त पदोन्नतीने काही जागा भरण्याचे बाकी आहे. ११ टक्के प्रमाणे पदोन्नतीसाठी योग्य उमेदवार मिळत नाही. जिल्हाधिकारी कार्यालयात अव्वल कारकूनाची १०० टक्के पदे पदोन्नतीने भरली जातात. अव्वल कारकुन पदाची एकूण १५० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३४ पदे मे, २०१५ पर्यंत भरण्यात आलेली आहेत. सन २०१४-२०१५ मध्ये १० पदे भरण्यात आलेली आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमातीची १६ पदे रिक्त आहेत.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांचे आरक्षण कमी केले आहे. ज्या जिल्ह्यात भटक्या जमातीचे आरक्षण कमी केलेले आहे, अशा जिल्ह्यातील आरक्षण कोटा दुस-या कोणत्या तरी जिल्ह्यास देण्याबाबतची कार्यवाही केली पाहिजे. याबाबत विचारणा केली असता, सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मागासवर्ग कक्ष) यांनी विदित केले की, सदरहू प्रश्न धोरणात्मक बाबीशी निगडित आहे. ज्या जिल्ह्यात आदिवासी बांधवांची टक्केवारी जास्त आहे, अशा जिल्ह्यात आदिवासींना जास्तीचे आरक्षण देता यावे यासाठी इतर प्रवर्गातील लोकांच्या आरक्षणाची टक्केवारी कमी करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी आदिवासी प्रवर्गातील लोकांची संख्या कमी आहे, त्या ठिकाणी भटक्या जमातीचे आरक्षण वाढविणे ही एक धोरणात्मक बाब आहे. लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्येक जिल्हा हा युनिट धरुन पुढील कार्यवाही केली जाते. आरक्षण हे नियमानुसार दिलेले असते. जिल्ह्यानुसार आरक्षण दिले जात नाही. शासनाने फक्त आदिवासी बांधवांसाठी तशा प्रकारचा निर्णय घेतलेला होता.

समितीने, इतर मागास प्रवर्ग आणि भटक्या जमाती प्रवर्गातील लोकांवर अन्याय होता कामा नये, एवढीच या ठिकाणी प्रामाणिक भावना आहे. यवतमाळ जिल्ह्यात बंजारा समाज मोठया प्रमाणावर आहे. त्या ठिकाणी ओबीसी किंवा एसटी प्रवर्गाचे आरक्षण काढून आपण ते बंजारा समाजाला देऊ शकतो का अशी विचारणा केली असता विभागाने म्हणणे मांडले की, सदरहू प्रश्न धोरणात्मक बाबीशी निगडित आहे. सदरहू विषय शासन स्तरावर सोडविण्याची गरज आहे.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी आरक्षित असलेल्या तलाठी संवर्गातील मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या पदोन्नतीची सद्य:स्थिती विचारली असता मंडल अधिका-यांची पदे पदोन्नतीने भरली जातात. ४० टक्के मंजूर पदे आहेत. त्या अनुषंगाने आरक्षणानुसार पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण केलेली आहे. तलाठ्याची १०० टक्के पदे सरळसेवेने भरली जातात. गडचिरोली जिल्ह्यात २३७ पदे मंजूर आहेत या पदांपैकी ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीची १९ पदे आरक्षित असून त्यापैकी १८ पदे भरण्यात आलेली आहेत. एक पद रिक्त आहे. ते पद लवकरच भरले जाणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कार्यालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदोन्नतीने ३ पदे व शिपाई संवर्गातील पदे भरण्याची सद्य:स्थिती काय आहे असे समितीने विचारले असता विभागाकडून माहिती मिळाली की, लिपिक संवर्गात दोन प्रकारे भरती केली जाते. त्यामध्ये ७५ टक्के पदे सरळसेवेने आणि २५ टक्के पदे पदोन्नतीने भरली जातात. यासाठी महसूल विभाग आणि पुरवठा विभाग असे दोन विभाग केले आहेत. या दोन्ही विभागासाठी एकूण २०९ पदे आहेत. त्यापैकी एकूण १८८ पदे भरण्यात आलेली आहेत. लिपिक संवर्गात एकूण १८ जागा विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गासाठी आरक्षित आहेत. त्यापैकी १५ पदे भरलेली असून ३ पदांचा अनुशेष आहे. महसूल विभागात शिपायाची १२५ तर पुरवठा विभागात २८ अशी शिपाईची एकूण १५३ पदे मंजूर आहेत. गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयाने १५२ पदे भरलेली आहेत.

समितीने विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या मंडल अधिकारी, तलाठी, अव्वल कारकून व लिपिक-टंकलेखक पदांसाठी बिंदू नामावली (रोस्टर) नोंदवही ठेवण्यात आली आहे काय, उक्त पदांचे रोस्टर सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून तपासून घेण्यात आले आहे काय, त्यात काही त्रुटी आढळल्या आहेत काय, अशी विचारणा केली असता उक्त पदांची बिंदू नामावली तपासलेली आहे. अव्वल कारकून, लिपिक अशा वेगवेगळ्या पदांचे रोस्टर कार्यालयाने ठेवलेले आहे. सदरहू रोस्टरची तपासणी दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ रोजी झालेली असून मागासवर्ग कक्षाने या बाबतीत कोणतेही आक्षेप घेतलेले नाहीत असे विभागीय सचिवांकडून अवगत करण्यात आले.

समितीने, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची अंतर्गत बदलीने पदे भरण्याचे कोणते नियम आहेत, याबाबत शासनाकडून परवानगी घेतली आहे काय  अशी विचारणा केली असता असता सन १९९७ च्या शासन निर्णयाप्रमाणे जर “अ” प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर, “ब” प्रवर्गातून तो भरता येईल. या शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत अदलाबदल करता येते, असे समितीस विभागीय सचिवांनी विदित केले.

समितीने, यावर असे मत व्यक्त केले की, उक्त परिस्थिती सन १९९७ पर्यंत होती. सन १९९७ पूर्वी काही वेळेस “अ” किंवा “ब” प्रवर्गातील उमेदवार मिळायचे नाहीत. त्यामुळे तेव्हा असा शासन निर्णय काढला गेला असेल. परंतु, आता तो शासन निर्णय बदलावा लागेल. आज विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्व प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध असतात. ज्यांच्यासाठी ते पद आरक्षित आहे, त्यांनाच ते मिळाले पाहिजे, या करीता शासनस्तरावर निर्णय घेता येईल का, हे पाहण्याची आवश्यकता आहे. आता विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजही शिक्षणाच्या बाबतीत पुढे जात आहे. काही नियुक्ती प्राधिकरणे याचा गैरफायदा घेत आहेत. “अ” प्रवर्गातील रिक्त पदावर उमेदवार उपलब्ध असला तरीही त्याला ते पद द्यावयाचे झाले तर, त्याला कमी गुण मिळाले आहेत असे सांगून त्या प्रवर्गातील उमेदवार मिळाला नाही अशी नोंद करुन ते पद “ब” प्रवर्गातील उमेदवाराला दिले जाते. काही नियुक्ती प्राधिकरणे शासन निर्णयाचा अर्थ असाही काढतात की, उमेदवार उपलब्ध असेल तरी, उपलब्ध नाही असे सांगतात. याबाबत केवळ सूचना करुन चालणार नाही तर शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करावी लागेल.



समितीने, जाहिरातीद्वारे भरती करण्यात आलेल्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली आहे काय, जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या सद्य:स्थितीबाबत विचारले असता विभागीय सचिवांकडून माहिती मिळाली की, अव्वल कारकुनाची पदोन्नतीने ७ पदे भरलेली आहेत. त्या सातही जणांनी प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत. मंडल अधिका-यांची पदोन्नतीने ३ पदे भरलेली असून तिघांनीही प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत. तलाठ्यांची सरळसेवेने १८ पदे भरली असून त्या १८ जणांनीही प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत. लिपिकांची पदोन्नतीने १२ पदे भरलेली असून बाराही जणांनी प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत. शिपायांची १३ पदे भरली आहेत. त्यातील १२ जणांनी प्रमाणपत्रे सादर केली आहेत. तर एकाचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे सादर केलेला आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील किती लोकांना मागील ३ वर्षांत घरकुले मंजूर करण्यात आली आहेत, इतर दुर्बल घटकातील लोकांना घरकुल देण्याबाबत शासनाचे काय निकष आहेत. जसा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांना घरकुल योजनेचा लाभ मिळतो. तसाच लाभ विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाला मिळण्याबाबत विचारले असता विभागीय सचिव, ग्रामविकास यांच्याकडून सांगण्यात आले की, मागच्या ३ वर्षांत ९८५ घरकुले मंजूर केलेली आहेत. इंदिरा आवास योजनेमध्ये अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गास ६० टक्के घरकुले दिली जातात. तर उर्वरित ४० टक्के घरकुलांमध्ये १५ टक्के घरकुले अल्पसंख्यांक व उर्वरित घरकुले सर्वसाधारण प्रवर्गाला मंजूर केली जातात. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाला सर्वसाधारण प्रवर्गात गणले जाते. ग्रामविकास विभागाच्या सन २०११ मधील शासन निर्णयानुसार ज्या गावांत सर्वात कमी घरकुले आहेत, तेथे प्राधान्याने या योजनेचा फायदा दिला जात असे. मात्र तो शासन निर्णय या वर्षी बदललेला आहे. या बदललेल्या शासन निर्णयानुसार प्रत्येक गावांतील बेघर लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळू शकेल. या वर्षापासून समाजकल्याण विभागाची रमाई निवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी घरकुल योजना, राजीव गांधी आवास योजना, इंदिरा आवास योजना अशा जवळपास  ४ ते ५ विभागांच्या घरकुलाच्या योजना एका छताखाली घेण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

समितीने अतिवृष्टीमुळे पडझड झालेल्या घरांना या योजनेंतर्गत घरकुल वाटप करण्यात येतात काय नसल्यास, त्यांना शासनाकडून कशा प्रकारे मदत देण्यात येते, याबाबत माहिती देण्यात सांगितले असता अतिवृष्टीमुळे पडझड झालेल्या घरांना या योजनेंतर्गत घरकूल वाटप करण्याची योजना केंद्र शासनाची

आहे. सदर योजनेसाठी केंद्र शासनामार्फत एकूण बजेटच्या ५ टक्के इतके बजेट राखून ठेवण्यात येते. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर त्यास एकत्रितरित्या मंजुरी देण्यात येते. मागील वर्षी राज्य शासनाने अशा प्रकारचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर केले होते. परंतु सर्व जिल्ह्यांचे एकत्रित प्रस्ताव न पाठविल्याने एकत्रित प्रस्ताव पाठविण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार सर्व जिल्ह्यांकडून प्रस्तावाची मागणी करण्यात आलेली असून सर्व जिल्ह्यांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाकडे एकत्रितरित्या प्रस्ताव पाठविण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

शासनाच्या यशवंत ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील किती लोकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. अद्यापपर्यंत किती लोकांचे पुनर्वसन करणे बाकी आहे, त्यासाठी किती कालावधी लागेल, याबाबत समितीने माहिती देण्यास सांगितले असता विभागाकडून माहिती मिळाली की, दिनांक २७ डिसेंबर २०११ अन्वये रमाई आवास योजनेच्या धर्तीवर विमुक्त जाती व भटक्या जमाती करीता २६९ चौरस फुट घरे देण्याची योजना आहे. या योजनेंतर्गत २० लाभार्थ्यांची निवड प्रत्येक जिल्ह्यातून करण्यात येणार होती. त्यासाठी लाभार्थी हा दारिद्र्य रेषेखालील असावा, गावोगावी भटकंती करुन उपजिविका भागविणारा असावा, तसेच तो सहा महिने एका ठिकाणी वास्तव्यात असावा अशाप्रकारचे निकष होते. या योजनेसाठी गावांची निवड करण्यात आली आहे. परंतु निकषानुसार एकही लाभार्थी पात्र ठरत नाही.

यावर समितीने असे निदेशित केले की, योजनेतील अटी व शर्ती जाचक आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या २० लोकांना एकत्रित राहण्यासाठी जागा व पाळण्यासाठी गुरे देण्याबाबतच्या योजनेस राज्यातून थंड प्रतिसाद मिळाला होता. या अनेक योजनांसाठी लाभार्थी पात्र ठरत नाहीत म्हणून अटी शिथील करण्याबाबत विशेषतः ६ महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा ही जाचक अट रद्द करण्याबाबत कार्यवाही करावी.

समितीने गडचिरोली जिल्ह्यात एकूण किती तांडा वस्ती आहेत, त्यासाठी गतवर्षात चालू आर्थिक वर्षात किती निधीची तरतूद केली आहे, याची माहिती विचारली असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये एकूण २१ तांडा वस्ती आहेत. गडचिरोली तालुक्यातील सुरीडोंगरी व मोटेगाव, अहेरी तालुक्यातील चिल्लेवारा, नागरेपल्ली या गावांमध्ये तांडा वस्ती आहेत. योजनेत्तर लेखाशिर्षाखाली तांडा वस्तीसाठी निधी प्राप्त होतो. सन २०१०-११ मध्ये २० लाख रुपये, २०११-१२ मध्ये ११ लाख रुपये, व सन २०१२-१३ मध्ये २४ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यावेळी विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, या योजनेसाठी मागील वर्षी २० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. सदरहू निधी खूपच कमी प्रमाणात आहे त्यात वाढ करावी.



**अभिप्राय व शिफारशी :**

समितीने, गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग-३ आणि वर्ग-४ ची पदे भरण्यासाठी कोणकोणत्या आणि किती वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येते अशी विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी माहिती दिली की, विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रे, दैनिक वर्तमानपत्र आणि माहिती व जनसंपर्क विभागाकडे ही जाहिरात प्रसिद्धीसाठी देण्यात येते. यावर, राज्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या जाहिरातीबाबत वेळेत माहिती व्हावी यासाठी योग्य ती दक्षता घेऊन लोकप्रिय असणा-या दैनिकांमध्ये पदांच्या बाबतीत जाहिराती दिल्या पाहिजेत, असे अभिप्राय समितीने व्यक्त केले.

(१) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने दिनांक १० जून, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीस जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध संवर्गातील अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील अव्वल कारकूनाची १६ पदे, तलाठ्याचे १ पद, लिपिकांची ३ पदे रिक्त असल्याचे समितीस आढळून आले. **सबब, समितीची अशी शिफारस आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयातील अव्वल कारकूनाची १६ पदे, तलाठ्याचे १ पद व लिपिकांची ३ पदे लवकरात लवकर भरून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

(२) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या घटकांसाठी रमाई आवास योजनेच्या धर्तीवर घरकूले बांधण्यासाठी शासनातर्फे यशवंत ग्रामसमृद्धी योजना राबविण्यात येते. या योजनेद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील कुटुंबांचे राहणीमान उंचावण्यासाठी २६९ चौरस फुट घरे बांधून देण्यात येतात. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातून २० लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. त्यासाठी लाभार्थी हा गावोगावी भटकंती करून उपजिविका करणारा व दारिद्र्य रेषेखालील असावा. तसेच तो लाभार्थी वर्षभरात किमान ६ महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा अशा प्रकारचे निकष आहेत. तथापि, या निकषानुसार एकही लाभार्थी पात्र ठरत नाही असे आढळून आले आहे. या अटींपैकी लाभार्थी किमान सहा महिने एकाच ठिकाणी वास्तव्यास असावा. या अटीबाबत समितीचे म्हणणे आहे की, मुळातच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांचे जीवन हे भटकंतीवर अवलंबून आहे. अशा वेळेस लाभार्थी जर सहा महिने एका ठिकाणी बसून राहीला तर स्वत:ची व कुटुंबाची उपजिविका करुच शकत नाही, त्यासाठी त्याला राज्यभर फिरावेच लागेल. म्हणून, **समिती अशी शिफारस करीत आहे की, या योजनेतील लाभार्थी हा वर्षभरात किमान ६ महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा ही अट रद्द करून त्यात शिथिलता आणण्यासाठी कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत सादर करावी.**

(३) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या प्रवर्गास एका जागी स्थिर जीवन जगता यावे व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तांडा/वस्ती सुधार योजना शासनातर्फे राबविली जाते. गडचिरोली

जिल्ह्यात अशा २१ तांडावस्ती आहेत. या तांडा/वस्तीसाठी शासनाने विमुक्त जाती व भटक्या जमातीचे ५० ते १००, १०० ते १५० व १५० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेले तांडा/वस्ती निर्माण केले आहेत. या वस्त्यांमध्ये पुरविण्यात येणा-या सोयी सुविधांसाठी राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणारा निधी अपूरा पडत असतो. **सबब, तांडा/वस्तीसाठी पुरविण्यात येणारा निधी अपूरा पडत असल्याने त्यामध्ये वाढ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**



## परिशिष्ट-एक

## जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचेकडून दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीला प्राप्त झालेली माहिती

**कार्यालय सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली**
**विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती**
**सन २०१०-११ ते माहे जुलै २०१३ अखेर**

(रुपये लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नांव | आर्थिक वर्ष | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१०-११ | | | २०११-१२ | | | २०१२-१३ | | | २०१३-१४ (जुलै २०१३अखेर) | | |
| | | तरतूद | खर्च | विद्यार्थी | तरतूद | खर्च | विद्यार्थी | तरतूद | खर्च | विद्यार्थी | तरतूद | खर्च | विद्यार्थी |
| १ | भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती | १०९.५१ | १०९.५१ | २११८ | १११.९५ | १११.९५ | १८८३ | १३२.१६ | १३२.१६ | १५१४ | ५०.०० | २८.६१ | ३३८ |
| २ | शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क | १४.४० | १४.४० | २८८ | २.१८ | २.१८ | १७ | १३.०६ | १३.०६ | ४८५ | ७.२५ | ५.५८ | ६३ |
| ३ | इ.८ ते १० वी च्या विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती | ३१.८६ | ३१.८६ | ३१८६ | २९.८७ | २९.८७ | २९८७ | ३१.०४ | ३१.०४ | ३१०५ | १७.०० | ० | ० |
| ४ | तांडा वस्ती सुधार योजना | २०.०० | २०.०० | ४ कामे | ११.०० | ११.०० | २ कामे | २४.२० | २४.२० | ५ कामे | अप्राप्त | ० | ० |

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, गडचिरोली



विषय :- <u>महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीला माहिती पुरविण्याबाबत.</u>

| मुद्दा क्र. | मुद्दा | अनुपालन |
|---|---|---|
| २३ | इंदिरा आवास योजनेअंतर्गत तालुकानिहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थीसाठी गत तीन वर्षात किती घरे बांधण्यात आली. यासाठी लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया कशी आहे ? | इंदिरा आवास योजने अंतर्गत तालुकानिहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थ्यांसाठी गत तीन वर्षात ९८५ घरे बांधण्यात आली. तालुकानिहाय प्रपत्र सोबत जोडण्यात येत आहे. यासाठी लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया पुढील प्रमाणे आहे.<br>महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.इंआयो-२०१०/प्र.क्र.३४/यो-१० दिनांक ९ एप्रिल, २०१० अन्वये प्रथम जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतीची इंदिरा आवास योजनेखालील दिनांक ०१.०४.२०१० रोजी शिल्लक लाभार्थ्यांच्या संख्येनुसार चढत्या क्रमाने यादी तयार करण्यात आली आहे. ०१.०४.२०१० रोजी ज्या ग्रामपंचायत मध्ये कायम प्रतिक्षा यादी सर्वात कमी कुटूंबे आहेत. अशी ग्रामपंचायत प्रथम क्रमांकावर व त्यानंतर चढत्या क्रमाणे (Ascending Order) ग्राम पंचायतची यादी तयार करण्यात आली आहे. शासनाच्या इंदिरा आवास योजने अंतर्गत दरवर्षी प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टानुसार ६०% अनुसूचित जाती / जमाती करीता व १५% अल्पसंख्यांक व उर्वरीत सर्वसाधारण प्रवर्गाकरीता घरकुले मंजुर करण्यात येत आहेत. सर्वसाधारण प्रवर्गामधुन चढत्याक्रमाणे येणाऱ्या ग्रामपंचायत अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीचे लाभार्थी समाविष्ट असतात. त्यानुसार अशा प्रवर्गांना ९८५ घरकुलाचा लाभ देण्यात आलेला आहे. |

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
गडचिरोली **करिता**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गडचिरोली**

विषय : महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीला माहिती पुरविण्याबाबत.

मुद्दा क्रमांक २३ :- इंदिरा आवास योजने अंतर्गत तालुकानिहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थ्यांसाठी गत तीन वर्षात ९८५ घरे बांधण्यात आली यासाठी लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया सोबत जोडलेल्या विवरण पत्रात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका | विमुक्त जाती करीता बांधण्यात आलेली घरकुले | | | | | भटक्या जमाती करीता बांधण्यात आलेली घरकुले | | | | | विमुक्त व भटक्या जमाती करीता बांधण्यात आलेली एकुण घरकुले | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | Total | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | Total | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | Total |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १ | अहेरी | ० | ४ | ४९ | ० | ५३ | ० | ० | १० | १ | ११ | ० | ४ | ५९ | १ | ६४ |
| २ | आरमोरी | ४१ | २५ | ३१ | ११ | १०८ | ६ | २८ | ३२ | ४ | ७० | ४७ | ५३ | ६३ | १५ | १७८ |
| ३ | भामरागड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | चामोर्शी | ५९ | १४२ | २४ | ८ | २३३ | १७ | १ | ० | १ | १९ | ७६ | १४३ | २४ | ९ | २५२ |
| ५ | धानोरा | ६ | ३ | ५ | ० | १४ | १४ | ९ | २ | ० | २५ | २० | १२ | ७ | ० | ३९ |
| ६ | एटापल्ली | ५ | १ | २ | ० | ८ | ० | ० | ० | ० | ० | ५ | १ | २ | ० | ८ |
| ७ | गडचिरोली | २० | ४५ | ८२ | ४ | १५१ | ७ | ३ | १३ | १ | २४ | २७ | ४८ | ९५ | ५ | १७५ |
| ८ | कोरची | ४ | १८ | ३ | १ | २६ | ० | ० | ६ | ० | ६ | ४ | १८ | ९ | १ | ३२ |
| ९ | कुरखेडा | ७ | १७ | ७ | २ | ३३ | ० | ७ | ६ | १ | १४ | ७ | २४ | १३ | ३ | ४७ |
| १० | मुलचेरा | ० | ४ | १ | ० | ५ | ० | ० | ३ | ० | ३ | ० | ४ | ४ | ० | ८ |
| ११ | सिरोंचा | ३७ | २५ | ६२ | ८ | १३२ | ० | ३ | ९ | २ | १४ | ३७ | २८ | ७१ | १० | १४६ |
| १२ | देसाईगंज | १३ | ० | ४ | ३ | २० | ४ | ८ | ३ | १ | १६ | १७ | ८ | ७ | ४ | ३६ |
| | एकूण | १९२ | २८४ | २७० | ३७ | ७८३ | ४८ | ५९ | ८४ | ११ | २०२ | २४० | ३४३ | ३५४ | ४८ | ९८५ |

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
गडचिरोली करिता



# परिशिष्ट-दोन

## जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचेकडून दिनांक १० जून २०१५ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेली माहिती

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने जिल्हाधिकारी कार्यालय व त्या अंतर्गत प्रांत कार्यालय, तहसिलदार कार्यालयातील सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांची भरती , बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविलेल्या कल्याणकारी योजना इत्यादीसंबंधीतील खालीलप्रमाणे प्रश्नांची उत्तरांची अद्यावत माहिती

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1. | जिल्हाधिकारी प्रांत, तालुका स्तरावरील तहसिलदार कार्यालयातील कर्मचारी वृंदाची रचना कशाप्रकारे विहित केली आहे, याची माहिती देण्यात यावी | जिल्हाधिकारी, प्रांत, तालुका स्तरावरील तहसिलदार कार्यालयातील सन 2006 मध्ये शासनाने महसूल विभागाकरिता आकृतीबंध (स्टॉपिंग पॅटर्न) विहीत केलेला आहे. त्यानुसार कर्मचारी वृंदाची रचना विहित केलेली असून, त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, प्रांत (उपविभाग), तालुका स्तरावरील तहसिलदार कार्यालयातील कामे केली जातात. |
| 2 | उपरोक्त कार्यालयातील विविध पदावर उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय ? असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे ? | वर्ग-3 संवर्गातील अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी, लिपीक- टंकलेखक व वर्ग-4 संवर्गातील शिपाई ही पदे या कार्यालयाकडून भरल्या जातात. सदरहु पदावर नियुक्ती करण्यासाठी सेवाप्रवेश नियम शासनानी तयार केलेली आहेत. वर नमुद पदांच्या सेवा प्रवेश नियमाबाबतची प्रत सोबत जोडलेली आहे. |



| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 3 अ) | जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रांत कार्यालय तसेच तालुका स्तरावरील (तहसिलदार) कार्यालयात वर्ग 1 ते 4 मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांची मंजूर संख्या किती आहे. त्यापैकी दिनांक 31.3.2015 अखेरपर्यंत एकूण किती पदे भरण्यात आली आहेत ? | जिल्हाधिकारी, प्रांत तसेच तालुका स्तरावरील कार्यालयातील वर्ग-1 व वर्ग-2 च्या पदावर नेमणुकीचे अधिकार जिल्हाधिका-यांना नाहीत. वर्ग-1 व वर्ग-2 च्या पदाबाबत नेमणूक शासनस्तरावरुन करण्यात येते. वर्ग 3 व वर्ग 4 मधील तांत्रिक व अतांत्रिक नेमणुक करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना आहेत. त्याअनुषंगाने वर्ग-3 व 4 संवर्गामध्ये मंजूर व भरलेल्या |

| अ. क्र. | पदाचे नांव | दि.31.5.2015 अखेरची स्थिती: मंजूर | एकुण कार्यरत | सन 2014-15 मध्ये भरलेली पदे | सद्य स्थितीत रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ग-3 संवर्ग | | | | | | |
| 1 | अव्वल कारकून (पदोन्नती) | 150 | 134 | 10 | 16 | नविन आकृतीबंधानुसार, उपविभागीय कार्यालयाकडील 03 पदे व्यपगत झाल्याने व 03 पदे पुरवठा विभागास वर्ग करण्यात आल्यामुळे मंजूर पदसंख्या 156 वरुन (156-03-03=150) 150 अशी कमी झालेली आहे. रिक्त असलेली 16 पदे ही ना.तह. संवर्गात पदोन्नतीमुळे 09 पदे, सेवानिवृत्तीमुळे 03 पदे नुकतीच रिक्त झालेली आहेत व 04 पदे 20.05.2014 रोजी घेण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती निवड सभेच्यावेळी वि.जा.भ.ज. प्रवर्गाचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने |
| 2 | मंडळ अधिकारी (पदोन्नती) | 40 | 40 | 20 | 0 | -- |
| 3 | तलाठी (सरळसेवा) | 237 | 234 | 32 | 03 | रिक्त असलेली 03 पदे सेवानिवृत्तीमुळे नुकतीच रिक्त झालेली आहेत. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | लिपीक (सरळसेवा) (महसुल विभाग) | 125 | 137 | 0 | + 12 अतिरिक्त | नविन आकृत्तीबंधानुसार, उपविभागीय कार्यालयाकडील 03 पदे व्यपगत झाल्याने व पुरवठा विभागाकडून स्वतंत्र पदभरती करण्यात आल्याने, सरळसेवेची 31 मंजुर पदे पुरवठा विभागास वर्ग केल्यामुळे महसुल विभागाकडील सरळसेवेची मंजुर पदसंख्या कमी झाल्याने (पुर्वीची मंजुर पदे 159 (-) व्यपगत 03 (-) पुरवठा कडे वर्ग 31 (=) 125 सद्या मंजुर पदे) 12 कर्मचारी अतिरिक्त दिसून येत आहेत तथापि पदोन्नतीची 13 पदे रिक्त असल्याने त्यांचे तात्पुरते समायोजन पदोन्नतीच्या (महसुल) पदावर करण्यात आले आहे. |



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लिपीक (पदोन्नती) (महसुल विभाग) | 42 | 29 | 0 | 13 | पुरवठा विभागाकडून स्वतंत्र पदभरती करण्यात आल्याने, पदोन्नतीची 11 मंजुर पदे पुरवठा विभागास वर्ग केल्यामुळे (महसुल कडील (पदोन्नती) पदसंख्या 53 (-) पुरवठा कडे वर्ग 11 (=) 42 सद्या मंजुर पदे). पदोन्नतीची 13 पदे रिक्त दिसून येत असली तरी त्यावर महसुल विभागाकडील सरळसेवेच्या 12 अतिरिक्त कर्मचा-यांचे तात्पुरते समायोजन करण्यात आले असल्याने प्रत्यक्षात 01 पद पदोन्नतीस उपलब्ध असून रिक्त आहे. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लिपीक (सरळसेवा) (पुरवठा विभाग) | 31 | 22 | 26 | 9 | सरळसेवा भरती प्रक्रियेत समांतर आरक्षणांर्तगतचे (अ.जा.01, अ.ज.02 व खुला 01) असे 04 माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे, 01 उमेदवार रुजू न झाल्यामुळे व 03 कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने आणि 01 कर्मचारी बडतर्फ झाल्यामुळे 09 पदे रिक्त आहेत. |
| | | | लिपीक (पदोन्नती) (पुरवठा विभाग) | 11 | 0 | 0 | 11 | पुरवठा विभागाकडे शिपाई संवर्गात पदोन्नतीस पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरची 11 पदे रिक्त राहीली आहेत. |
| | | 5 | वाहन चालक | 24 | 23 | 0 | 1 | रिक्त असलेले 01 पद मृत्यूमुळे नुकतेच रिक्त झाले आहे. |
| | | | एकूण | 660 | 619 | 88 | 41 | -- |



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग-4 संवर्ग | | | | | | |
| | | 6 | शिपाई (महसुल विभाग) | 125 | 147 | 0 | +22 अतिरिक्त | पुरवठा विभागाकडून स्वतंत्र पदभरती करण्यात आल्याने, 28 मंजुर पदे पुरवठा विभागास वर्ग केल्यामुळे महसुल विभागाकडील शिपाई संवर्गाची मंजुर पदसंख्या कमी झाल्याने (पुर्वीची मंजुर पदे 153 (-) पुरवठा कडे वर्ग 28 (=) 125 सद्या मंजुर पदे) 22 शिपाई अतिरिक्त दिसून येत आहेत. अतिरिक्त शिपाई यांचे तात्पुरते समायोजन पुरवठा विभागाकडील रिक्त पदावर करण्यात आले आहे. |
| | | | शिपाई (पुरवठा विभाग) | 28 | 5 | 5 | 23 | पुरवठा विभागाकडून स्वतंत्र पदभरती करण्यात आल्याने, 23 पदे रिक्त दिसून येत असली तरी त्यावर महसूल विभागाकडील 22 कर्मचा-यांचे तात्पुरते समायोजन करण्यात आले असल्याने प्रत्यक्षात 01 पद भरतीस उपलब्ध असून मृत्यूमुळे रिक्त आहे. |

| | | |
|---|---|---|
| 3 ब) | उक्त मंजूर पदांपैकी वर्ग 1 ते 4 मधील किती व कोणकोणती पदे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत ? राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी मे 2015 अखेर एकुण किती पदे भरण्यात आली आहेत व किती पदे रिक्त आहेत ? पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? | वर्ग-1 व वर्ग-2 च्या पदावर नेमणुकीचे अधिकार जिल्हाधिका-यांना नाहीत. वर्ग-1 व वर्ग-2 च्या पदाबाबत नेमणूक शासनस्तरावरून करण्यात येते. जिल्हाधिका-यांना वर्ग 3 व 4 ची पदे भरण्याचे अधिकार आहेत. मंजूर पदापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पदाबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे. |

| अक्र | पदाचे नांव | विमुक्त जाती भटक्या जमातीकरिता राखीव पदांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | एकुण |
| | पदोन्नती आरक्षण टक्केवारी | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 11% |
| | सरळसेवा आरक्षण टक्केवारी | 2 % | 2% | 2.5% | 1.5% | 8% |

**वर्ग-3 संवर्ग**

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तपशिल | संवर्गातील एकूण पदसंख्या | वि.जा.भ.ज. करीता आरक्षित पदे | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | एकूण वि.जा.भ.ज | |
| 1 | अव्वल कारकून (100 % पदोन्नती) | मंजूर पदे | 150 | 4 | 4 | 5 | 3 | 16 | लिपिक संवर्गात सदर प्रवर्गाचे पदोन्नतीस पात्र (विभा. दुय्यम सेवा परीक्षा व महसुल अर्हता परीक्षा उत्तिर्ण अथवा वयाची 45 वर्षे पुर्ण झाल्याने त्यापासून सुट मिळालेले) कर्मचारी उपलब्ध न झाल्याने पदे रिक्त आहेत. |
| | | भरलेली पदे | 134 | 1 | 2 | 2 | 2 | 7 | |
| | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-) 16 | (-) 3 | (-) 2 | (-) 3 | (-) 1 | (-) 9 | |



| अ.क्र. | संवर्गाचे नांव | तपशिल | संवर्गातील एकूण पदसंख्या | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | एकूण वि.जा.भ.ज | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | लिपीक टंकलेखक (75 %सरळसेवा) (महसुल विभाग) | मंजूर पदे | 125 | 2 | 3 | 3 | 2 | 10 | नविन आकृत्तीबंधानुसार, उपविभागीय कार्यालयाकडील 03 पदे व्यपगत झाल्याने व पुरवठा विभागाकडून स्वतंत्र पदभरती करण्यात आल्याने, सरळसेवेची 31 मंजुर पदे पुरवठा विभागास वर्ग केल्यामुळे, मंजुर पदे कमी झाल्याने कर्मचारी अतिरिक्त दिसून येत आहेत. |
| | | भरलेली पदे | 137 | 3 | 3 | 3 | 3 | 12 | |
| | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (+) 12 | (+)1 | 0 | 0 | (+)1 | (+)2 | |
| | लिपीक टंकलेखक (25% पदोन्नती) (महसुल विभाग) | मंजूर पदे | 42 | 1 | 1 | 2 | 1 | 5 | शिपाई संवर्गात सदर प्रवर्गाचे पदोन्नतीस पात्र (एसएससी पास + इंग्रजी टायपिंग 40 श.प्र.मि/ मराठी टायपिंग 30 श.प्र.मि + शिपाई पदावर 03 वर्ष अखंडीत सेवा) कर्मचारी उपलब्ध न झाल्याने पदे रिक्त आहेत. |
| | | भरलेली पदे | 29 | 1 | 0 | 1 | 0 | 2 | |
| | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-) 13 | 0 | (-) 1 | (-) 1 | (-) 1 | (-) 3 | |
| 5 | लिपीक टंकलेखक (75 %सरळसेवा) (पुरवठा विभाग) | मंजूर पदे | 31 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | सरळसेवा भरती प्रक्रियेत निवड करण्यात आलेला (निवड व प्रतिक्षा यादीतील) वि.जा.-अ प्रवर्गाचा उमेदवार रुजू न झाल्यामुळे 01 पद रिक्त आहे |
| | | भरलेली पदे | 22 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | |
| | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-)9 | (-)1 | (-)1 | (+)1 | 0 | (-)1 | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | मंडळ अधिकारी (100% पदोन्नती) | मंजूर पदे | 40 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | तलाठी संवर्गात सदर प्रवर्गाचे पदोन्नतीस पात्र कर्मचारी उपलब्ध न झाल्याने पदे रिक्त आहेत. भ.ज.-ब मध्ये जादा भरण्यात आलेले पद शा. नि. 18.10.1997 नुसार अंतर्गत परिवर्तनातंर्गत भरण्यात आलेले आहेत. |
| | | | | भरलेली पदे | 40 | 0 | 2 | 0 | 1 | 3 | |
| | | | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | 0 | (-) 1 | (+) 1 | (-) 1 | 0 | (-) 1 | |
| | | 3 | तलाठी (100 % सरळसेवा) | मंजूर पदे | 237 | 5 | 5 | 6 | 3 | 19 | 3 उपविभाग नव्याने निर्मित झाल्याने पदांचे समायोजन करतांना उपविभाग देसाईगंज यांचेकडे 1 पदाचा अनुशेष दिसून येतो. तथापी रिक्त पद शिल्लक नसल्याने अनुशेष भरता आलेला नाही. भ.ज.-ब व भ.ज.-ड मध्ये जादा भरण्यात आलेली पदे शा. नि. 29.03.1997 नुसार अंतर्गत परिवर्तनातंर्गत भरण्यात आलेली आहेत. |
| | | | | भरलेली पदे | 234 | 2 | 8 | 3 | 5 | 18 | |
| | | | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-) 3 | (-) 3 | (+) 3 | (-) 3 | (+) 2 | (-) 1 | |



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लिपीक टंकलेखक (25% पदोन्नती) (पुरवठा विभाग) | मंजूर पदे | 11 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | पुरवठा विभागाकडे शिपाई संवर्गात पदोन्नतीस पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदर पद रिक्त आहे. |
| | | | | भरलेली पदे | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-) 11 | (-) 1 | 0 | 0 | 0 | (-) 1 | |
| | | 6 | वाहन चालक (100% सरळसेवा) | मंजूर पदे | 24 | 0 | 1 | 1 | 0 | 2 | सदर प्रवर्गात मृत्युमुळे 1 पद नुकतेच रिक्त झालेले आहे. |
| | | | | भरलेली पदे | 23 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | |
| | | | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-) 1 | 0 | (-) 1 | 0 | 0 | (-) 1 | |
| | | वर्ग-4 संवर्ग | | | | | | | | | |
| | | 7 | शिपाई (100 %सरळसेवा) (महसुल विभाग) | मंजूर पदे | 125 | 2 | 3 | 3 | 2 | 10 | जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडून प्राप्त अतिरिक्त संवर्गातील कर्मचा-यांचे दि.01.06.2006 ला समायोजन केल्यामुळे पदे जादा झाली आहेत. भ.ज.-ब मध्ये जादा भरण्यात आलेली पदे शा. नि. 29.03.1997 नुसार अंतर्गत परिवर्तनातंर्गत भरण्यात आलेली आहेत. |
| | | | | भरलेली पदे | 147 | 1 | 9 | 1 | 2 | 13 | |
| | | | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (+) 22 | (-) 1 | (+) 6 | (-) 2 | 0 | (+) 3 | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शिपाई (100 %सरळसेवा) ( पुरवठा विभाग) | मंजूर पदे | 28 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | पुरवठा विभागाकडून स्वतंत्र पदभरती करण्यात आल्याने, 23 पदे रिक्त दिसून येत असली तरी त्यावर महसूल विभागाकडील 22 कर्मचा-यांचे तात्पुरते समायोजन करण्यात आले असल्याने प्रत्यक्षात भरतीस पद उपलब्ध नाहीत |
| | | | | भरलेली पदे | 5 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | |
| | | | | रिक्त पदे (अधिक/उणे (+)(-) | (-) 23 | (-) 1 | (-)1 | (+) 1 | 0 | (-)1 | |



| | | |
|---|---|---|
| 4 | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली वर्ग 1 ते 4 मधील पदे भरण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबविण्यात येते. याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. | वर्ग-1 व वर्ग-2 च्या पदावर नेमणुकीचे अधिकार जिल्हाधिका-यांना नाहीत. वर्ग-1 व वर्ग-2 च्या पदाबाबत नेमणूक शासनस्तरावरुन करण्यात येते. जिल्हाधिका-यांना वर्ग 3 व 4 ची पदे भरण्याचे अधिकार आहेत. याबाबत जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेली वर्ग-3 व 4 ची पदोन्नतीने भरावयाची पदे भरण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयीन स्तरावर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व सदस्य सचिव म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी यांचा समावेश असलेली विभागीय पदोन्नती निवड समिती गठित करुन, उपरोक्त समितीमार्फत अटी व शर्तीचे अधिन राहून विभागीय पदोन्नती निवड समितीची बैठक आयोजित करुन त्याद्वारे सर्व खुला व आरक्षित प्रवर्गातील कर्मचा-यांची पदोन्नतीची निवडसुची अंतिम करुन सर्व प्रवर्गातील कर्मचारी यांना खुला तसेच विविध प्रवर्गासाठी आरक्षित पदांवर प्रवर्गनिहाय आरक्षणाच्या टक्केवारीनुसार रिक्त असलेल्या पदावर, शासनाने विहीत केलेल्या कार्य पध्दत्तीनुसार पदोन्नती देण्यात येते. वरील प्रक्रियेअंतर्गतच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली वर्ग 3 ते 4 मधील पदोन्नतीची पदे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात येतात.<br>त्याचप्रमाणे, जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेली वर्ग-3 व 4 ची सरळसेवेनी भरावयाची पदे भरण्यासाठी शासनानी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या जिल्हा निवड समिती कडून जाहिरातीद्वारे स्पर्धा परिक्षा आयोजित करुन, निवड समितीमार्फत उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करुन खुला तसेच विविध प्रवर्गासाठी आरक्षित पदांवर प्रवर्गनिहाय आरक्षणाच्या टक्केवारीनुसार रिक्त असलेल्या पदावर शासनाने विहीत केलेल्या कार्य पध्दत्तीनुसार उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करुन रिकत पदे भरण्यात येतात. वरील प्रक्रियेअंतर्गतच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली वर्ग 3 ते 4 मधील सरळसेवेची पदे सुध्दा त्यांच प्रवर्गातील उमेदवारांसाठी आरक्षित ठेवून विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात येतात. |
| 5 अ) | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी सन 2010-11, 2011-12, 2012 ते मे , 2015 अखेर या कालावधीत वर्षनिहाय किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या ? (जाहिरातीच्या कात्रणाच्या झेरॉक्स प्रती तपासणीचे वेळी समितीला उपलब्ध करुन द्याव्यात.) | खुला प्रवर्गातील तसेच मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेली रिक्त पदे भरण्यासाठी, या कार्यालयाकडून खालीलप्रमाणे जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या.<br>सन 2010-11 मध्ये तलाठी व लिपीक टंकलेखक संवर्गाची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरणेस्तव दिनांक 5.11.2010 रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.<br>सन 2011-12 मध्ये तलाठी, लिपीक टंकलेखक, वाहन चालक व शिपाई यांची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यास्तव दिनांक 21.9.2011 रोजी व दिनांक 17.3.2012 दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>तसेच सन 2012-13 मध्ये तलाठी, लिपीक टंकलेखक, वाहन चालक व शिपाई यांची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यास्तव दिनांक 6.9.2012 रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. उपरोक्त जाहिरातीमध्येच त्या त्या वेळी रिक्त असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या रिक्त पदांचा समावेश करण्यात आलेला होता. |

| | | |
|---|---|---|
| | | **सन 2014-15 मध्ये तलाठी यांची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यास्तव दिनांक 31.05.2014 रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तसेच पुरवठा विभागातील लिपिक टंकलेखक/गोदामपाल/ गोदाम लिपिक व शिपाई/गोदाम चौकीदार/ हमाल कम स्विपर यांची विविध प्रवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यास्तव दिनांक 15.05.2014 रोजी दैनिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. उपरोक्त जाहिरातीमध्येच त्या वेळी रिक्त असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या रिक्त पदांचा समावेश करण्यात आलेला होता.** |
| 5 ब) | उक्त जाहिरातीनुसार वर्ष निहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली कोणकोणती पदे भरण्यात आली आहेत ? | जाहिरातीनुसार वर्ष निहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली खालीलप्रमाणे पदे भरण्यात आली आहेत. |

| जाहिरातीचा दिनांक | संवर्गनिहाय भरण्यात आलेली विमुक्त जाती व भटक्या जमातीची राखीव पदे | | | |
|---|---|---|---|---|
| | तलाठी | लिपीक | वाहन चालक | शिपाई |
| 5.11.2010 | भज- (ड)-2 पदे | भज (क) - 1 पद<br>भज (ड) - 2 पदे | -- | -- |
| 21.9.2011 | -- | -- | -- | -- |
| 17.3.2012 | -- | वि.जा.(अ) -1 पद | -- | वि.जा.(अ)- 1 पद |
| 6.9.2012 | वि.जा.(अ)-1 पद<br>भ.ज.(क) - 1पद | -- | भ.ज.(क) - 1 पद | -- |
| 15.05.2014 | -- | विजा.(अ) - 1 पद<br>(उमेदवार रुजू झाला नाही )<br>भ.ज.(क)- 1 पद | -- | भ.ज. (क) - 1 पद |
| 31.5.2014 | वि.जा.(अ) -1 पद<br>भ.ज.(ब) -2 पदे<br>भ.ज.(क)-1 पद<br>भ.ज.(ड) -1 पद | -- | -- | -- |



| | | |
|---|---|---|
| 6 | विमुक्त जाती व भटक्या जमातीतील अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती स्थापन करण्यात आली आहे काय( असल्यास, या निवड समितीमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीतील अधिका-यांचा समावेश करण्यात आला आहे काय( नसल्यास त्याची कारणे काय( | जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेली वर्ग-3 व 4 ची पदोन्नतीने भरावयाची पदे भरण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयीन स्तरावर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व सदस्य सचिव म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी यांचा समावेश असलेली विभागीय पदोन्नती निवड समिती गठित करुन, उपरोक्त समितीमार्फत अटी व शर्तीचे अधिन राहून विभागीय पदोन्नती निवड समितीची बैठक आयोजित करुन त्याद्वारे सर्व खुला व आरक्षित प्रवर्गातील कर्मचा-यांची पदोन्नतीची निवडसुची अंतिम करुन सर्व प्रवर्गातील कर्मचारी यांना खुला तसेच विविध प्रवर्गासाठी आरक्षित पदांवर प्रवर्गनिहाय आरक्षणाच्या टक्केवारीनुसार रिक्त असलेल्या पदावर शासनाने विहीत केलेल्या कार्य पध्दतीनुसार पदोन्नती देण्यात येते. वरील प्रक्रियेअंतर्गतच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली वर्ग 3 ते 4 मधील पदोन्नतीची पदे विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात येत असल्याने, केवळ वि.जा.भ.ज. तील अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात वेगळी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली नाही.<br>तथापि, या कार्यालयाकडे कार्यरत असलेल्या उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिका-यामध्ये त्या त्या वेळी वि.जा.भ.ज. प्रवर्गाचे प्रतिनिधित्व करणारे अधिकारी कार्यरत असल्याने त्यांचा समावेश मात्र सदस्य म्हणून निवड समितीमध्ये झालेला आहे. |
| 7 | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांना सन 2010-11, 2011-12 व 2012 ते मे 2015 अखेर वर्षनिहाय वर्ग 1 ते 4 मधील किती अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आली आहे, असल्यास कोणकोणत्या पदावर नसल्यास त्याची कारणे काय आहेत? | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांना संवर्गनिहाय पदोन्नती देण्यात आल्याबाबतची वर्षनिहाय माहिती खालील प्रमाणे आहे. |

| पदनाम वर्ग 3 | वर्षनिहाय पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | 2010-11 | 2011-12 | 2012 ते जुलै 2013 | 2013-2014 |
| 1) अव्वल कारकुन | 01 | -- | 02 | 01 |
| 2) मंडळ अधिकारी | -- | -- | 02 | 00 |
| 3) लिपीक टंकलेखक | 01 | -- | 01 | 00 |

| | | |
|---|---|---|
| 8 | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदासाठी 100 बिंदू व 50 बिंदुनामावली (रोस्टर) नोंदवही ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? | सर्वसाधारण व मागासवर्गियांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठीची पदोन्नती व सरळसेवेची 100 बिंदु नामावली ( रोस्टर ) नोंदवही पुर्वीपासूनच (1997 पासुन) ठेवण्यात आलेली असुन ती अद्यावत स्वरुपात आहे. बिंदू नामावली (रोस्टर) नोंदवह्या दिनांक 31.12.2014 पर्यंत लिहून अद्यावत करण्यात आलेल्या असून दिनांक 16.02.2015 रोजी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडून प्रमाणित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्येच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांचा सुध्दा समावेश आहे. |

| | | |
|---|---|---|
| 9 | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली पदे भरतांना मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात आले होते काय, असल्यास सन 2010-11, 2011-12, 2012 ते जुलै 2013 व मे, 2015 अखेर या कालावधीत वर्षनिहाय कोणकोणत्या तारखांना मुलाखतीचेवेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी उपस्थित होते. | जिल्हाधिकारी यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेली वर्ग-3 व 4 ची सरळसेवेनी भरावयाची पदे भरण्यासाठी शासनानी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या जिल्हा निवड समिती कडून जाहीरातीद्वारे स्पर्धा परिक्षा व मुलाखती द्वारा विहीत केलेल्या कार्य पध्दत्तीनुसार उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करुन रिक्त पदे भरण्यात येतात. शासन निर्णय 19 ऑक्टोंबर, 2010 नुसार, जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे जिल्हा निवड समितीचे पदसिध्द सदस्य असल्याने, त्यांचा जिल्हा निवड समितीमध्येच समावेश आहे, त्यामुळे पदे भरतांना त्यांना मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे जिल्हा निवड समिती सदस्य या नात्याने जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे प्रत्येक मुलाखतीच्या वेळी उपस्थित असतात. या कार्यालयाकडील पुढीलप्रमाणे झालेल्या मुलाखतीच्या वेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे उपस्थित होते.<br>सन 2011-2012 मुलाखत दिनांक - 28.12.2011, 08.06.2012.<br>सन 2012-2013 मुलाखत दिनांक - 20.10.2012<br>सन 2014-2015 मुलाखत दिनांक - 26.06.2014 |
| 10 | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेल्या रिक्त पदाबाबत व पदे भरल्याबाबत अहवाल सचिव, सामाजिक न्याय विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (मागासवर्ग कक्ष) मंत्रालय यांच्याकडे गत तीन वर्षात केव्हा पाठविण्यात आला आहे ? पाठविला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? | या कार्यालयाकडून मंजुर, भरलेल्या व रिक्त पदाबाबतचे मासिक विवरण दर महिन्यात सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मंुबई यांना पाठविण्यात आलेला आहे. |
| 11 अ | विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) यांनी विमुक्त जाती व भटक्या जमातीतील अधिकारी व कर्मचा-यासाठी असलेल्या आरक्षणाबाबत सन 2010-11, 2011-12, व 2012 ते जुलै 2013 जिल्हाधिकारी कार्यालयाची तपासणी केली आहे काय, असल्यास, कोणत्या तारखांना केली आहे. | सर्वसाधारण व मागासवर्गियांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठीची पदोन्नती व सरळसेवेच्या 100 बिंदू नामावली (रोस्टर), नोंदवह्या दिनांक 31.12.2014 पर्यंत लिहून अद्यावत करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्येच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांचा सुध्दा समावेश आहे. विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) यांनी विमुक्त जाती व भटक्या जमातीतील कर्मचा-यासाठी असलेल्या आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाची दिनांक 16.02.2015 रोजी तपासणी केलेली आहे. |



| | | |
|---|---|---|
| 11 ब | उक्त तपासणीत सहाय्यक आयुक्तांनी कोणकोणत्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. या त्रुटीची पुर्तता कशाप्रकारे केली आहे. | सर्वसाधारण व मागासवर्गियांसाठी आरक्षित असलेल्या पदासाठीची 100 बिंदु नामावली ( रोस्टर ) नोंदवही मध्ये सहाय्यक आयुक्तांनी कोणत्याही प्रकारच्या त्रुटी काढलेल्या नाहीत. परंतु मागासवर्गीयांचे जे आरक्षण शिल्लक आहे ते भरण्यास निर्देशित केलेले आहे. तसेच सरळसेवेच्या बिंदुनामावलीत भरलेल्या जास्तीच्या पदांचे समायोजन झाल्यानंतर पदोन्नतीची कार्यवाही करावी, असे निर्देश दिले आहेत. |
| 12 अ | जिल्हाधिकारी कार्यालय, प्रांत कार्यालय व तहसिलदार कार्यालयाकडे सध्या कार्यरत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली आहेत व किती कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली नाहीत ? | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या आरक्षित जागेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या वैधता प्रमाणपत्राबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे. (खालील तक्ता पहा) |

| अ. क्र. | पदाचे नाव | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या आरक्षित जागेवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची संख्या | विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचा-यांची संख्या | विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचा-यांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग-3 संवर्ग | | | | | |
| 1 | अव्वल कारकून (पदोन्नती) | 7 | 7 | -- | -- |
| 2 | मंडळ अधिकारी (पदोन्नती) | 3 | 3 | -- | -- |
| 3 | तलाठी (सरळसेवा) | 18 | 18 | -- | -- |
| 4 | लिपीक (सरळसेवा) (महसुल विभाग) | 12 | 12 | -- | -- |
| | लिपीक (पदोन्नती) (महसुल विभाग) | 2 | 2 | -- | -- |
| | लिपीक (सरळसेवा) (पुरवठा विभाग) | 1 | 1 | -- | -- |
| | लिपीक (पदोन्नती) (पुरवठा विभाग) | 0 | 0 | -- | -- |
| 5 | वाहन चालक (सरळसेवा) | 1 | 1 | -- | -- |
| | एकुण | 44 | 44 | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्ग 4 संवर्ग | | | | | |
| | | 6 | शिपाई (महसुल विभाग) | 13 | 12 | 1 | 01 कर्मचारी यांचे जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. |
| | | | शिपाई (पुरवठा विभाग) | 1 | 1 | -- | -- |
| 12 ब | जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचारी/अधिका-यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ? | यापुर्वी या कार्यालयाचे आदेश दिनांक 22 फेब्रुवारी, 2012 नुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचा-यांच्या यापुढील वेतनवाढी ते जोपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयाला सादर करीत नाहीत, तोपर्यंतच्या कालावधीपर्यंत रोखण्याची कारवाई करण्यात आली होती. | | | | | |
| 13 | विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात "विशेष मागासवर्ग कक्ष " स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे काय(असल्यास केव्हापासून तसेच त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन दिले आहेत. विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत. ? | मागासवर्गिय प्रवर्गाच्या अधिकारी कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष मागासवर्ग कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आलेला नाही. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी, कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी या कार्यालयाकडून वेळोवेळी निकाली काढल्या जातात. सध्यास्थितीत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी, कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी या कार्यालयामध्ये प्रलंबित नाहीत. विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन करणेबाबत मा. आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. | | | | | |
| 14 | मागील तीन वर्षात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडुन त्यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने जिल्हाधिकारी कार्यालयात प्राप्त झाली आहेत काय, असल्यास किती, तसेच त्यांचे स्वरुप काय आहे व सदर निवेदनाच्या संवर्गात काय कार्यवाही करण्यात आली आहे( | या कालावधीत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन त्यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे प्राप्त झालेले नाहीत. | | | | | |



| | | |
|---|---|---|
| 15 अ | उपरोक्त कार्यालयात नैमित्तिक कामगार वर्गाची (कॅज्युअल लेबर ) भरती करतेवेळी मागासवर्गीयांच्या विहित टक्केवारीचे प्रमाण राखले जाते काय ? नसल्यास का नाही ? | जिल्हाधिकारी / प्रांत / तालुका स्तरावरील तहसिलदार कार्यालयात नैमित्तिक कामगारांची नेमणूक केली जात नाही. |
| 15 ब | नैमित्तिक कामगार वर्गाची भरती केली जात असल्यास त्यांना कायम करण्यात येते काय ? असल्यास त्याचे निकष काय आहेत ? तसेच गेल्या तीन वर्षात किती कामगारांना कायम करण्यात आले व त्यापैकी विमुक्त जाती व भटक्या जमातीचे किती कामगार आहेत ? | प्रश्नच उद्भवत नाही. |
| 16 | "गलिच्छ वस्ती निर्मुलनासाठी केंद्र शासनाकडुन शासनामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयात अनुदान प्राप्त झाले आहे काय , असल्यास सन 2010-11,2011-12 व 2012 ते जुलै 2013 या कालावधीत वर्षनिहाय किती रक्कम प्राप्त झाली आहे व त्यांचा विनियोग कशा प्रकारे केला जातो. जिल्हाधिकारी / तहसिलदार कार्यालयाकडून विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस कर्ज दिले जाते काय ? असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ? | या कार्यालयाकडून विशेष घटक योजने अंतर्गत नागरी दलित वस्ती सुधारणा योजना शासन निर्णयाप्रमाणे नगर परिषद क्षेत्रात राबविल्या जातात.<br>मात्र विशेष घटक योजने अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकाकरीता योजना कार्यान्वित नाही. |
| 17 | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासासाठी विशेष घटक योजनेअंतर्गत सन 2010-11, 2011-12 व 2012 ते जूलै,2013 या वर्षात वर्षनिहाय किती अनुदान प्राप्त झाले आहे ? | विशेष घटक योजने अंतर्गत (अनुसुचित जाती उपयोजना) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासासाठी योजना कार्यान्वित नाही. केवळ अनुसुचित जातीच्या योजना कार्यान्वित आहे. त्यामुळे माहिती निरंक आहे. |

| | | |
|---|---|---|
| 18 | विशेष घटक योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या योजना व कामे याबाबत मंत्रालयीन स्तरावरून आढावा घेण्यात आला आहे काय ? असल्यास केव्हा, तसेच योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात संबधिताना काही अडचणी येतात काय, असल्यास त्यांचे स्वरूप काय आहेत ? | विशेष घटक योजने अंतर्गत (अनुसुचित जाती उपयोजना) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासासाठी योजना कार्यान्वित नाही. केवळ अनुसुचित जातीच्या योजना कार्यान्वित आहे. त्यामुळे माहिती निरंक आहे. |
| 19 | विशेष घटक योजने अंतर्गत शासनाचे मंजूर केलेल्या अनुदानाचा विनियोग जिल्हाधिकारी कार्यालयात तहसिलदार कार्यालयातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या विकासाठी न करता तो अन्य कामे/ योजनावर खर्च केल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे काय असल्यास, या प्रकरणी संबंधितांविरुध्द काय कारवाई केली आहे? | विशेष घटक योजने अंतर्गत (अनुसुचित जाती उपयोजना) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासासाठी योजना कार्यान्वित नाही. केवळ अनुसुचित जातीच्या योजना कार्यान्वित आहे. त्यामुळे माहिती निरंक आहे. |
| 20 | विशेष घटक योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातुन जिल्हाधिकारी कार्यालयाने विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी सन 2005-2006; 2006-2007, 2007-08 ( मार्च 2008 पर्यन्त) या वर्षात वर्षनिहाय वैयुक्तिक व सामुहिक विकासाच्या कोणकोणत्या योजना कार्यान्वित केल्या आहेत व त्यासाठी केलेली तरतुद व प्रत्यक्षात झालेला खर्च काय आहे, तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनाचे योजनानिहाय लाभार्थी किती आहेत याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी . | विशेष घटक योजने अंतर्गत (अनुसुचित जाती उपयोजना) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विकासासाठी योजना कार्यान्वित नाही. केवळ अनुसुचित जातीच्या योजना कार्यान्वित आहे. त्यामुळे माहिती निरंक आहे. |



| | | |
|---|---|---|
| 21 | जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत ( D.P.D.C.) आमदार/खासदार फंडातील प्रत्येकी किती टक्के निधी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात येतो. | जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत ( D.P.D.C.) आमदार/खासदार फंडात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी स्वतंत्र योजना नसल्यामुळे शासनाकडून निधी प्राप्त होत नाही. त्यामुळे खर्च निरंक समजण्यात यावा. |
| 22 | गत तीन वर्षात जिल्हयातील किती विधानसभा / विधानपरिषद सदस्यांनी आपला निधी उक्त प्रयोजनासाठी खर्च केलेला आहे ? किती सदस्यांचा निधी खर्च झालेला नाही ? | सदर बाबीवरील खर्च निरंक आहे. |
| 23 | इंदिरा आवास योजनेअंतर्गत तालुका निहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थीसाठी गत तीन वर्षात किती घरे बांधण्यात आली, यासाठी लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया कशी आहे ? | इंदिरा आवास योजनेअंतर्गत तालुका निहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लाभार्थ्यांसाठी गत तीन वर्षात 985 घरे बांधण्यात आली. तालुका निहाय प्रपत्र सोबत जोडण्यात येत आहे. यासाठी लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया पुढील प्रमाणे आहे.<br>महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. इंआयो-2010/ प्र.क्र.34/ यो-10 दिनांक 9 एप्रिल 2010 अन्वये प्रथम जिल्हयातील सर्व ग्राम पंचायतींची इंदिरा आवास योजनेखालील दिनांक 1.4.2010 रोजी शिल्लक लाभार्थ्यांच्या संख्येनुसार चढत्या क्रमाने यादी तयार करण्यात आली आहे. 1.4.2010 रोजी शिल्लक लाभार्थ्यांच्या संख्येनुसार चढत्या क्रमाने यादी तयार आली आहे. 1.4.2010 रोजी ज्या ग्रामपंचायत मध्ये कायम प्रतिक्षा यादी सर्वात कमी कुटुंबे आहेत. अशी ग्रामपंचायत प्रथम क्रमांकावर व त्यानंतर चढत्या प्रमाणे ( Ascending Order ) ग्राम पंचायतची यादी तयार करण्यात आली आहे. शासनाच्या इंदिरा आवास योजने अंतर्गत दरवर्षी प्राप्त होणा-या उद्दिष्टानुसार 60 % अनुसूचित जाती / जमाती करीता व 15 % अल्पसंख्यांक व उर्वरित सर्वसाधारण प्रवर्गाकरीता घरकुले मंजूर करण्यात येत आहेत. सर्वसाधारण प्रवर्गामधून चढत्याक्रमाने येणा-या ग्रामपंचायत अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीचे लाभार्थी समाविष्ट असतात. त्यानुसार अशा प्रवर्गांना 985 घरकुलाचा लाभ देण्यात आलेला आहे. |
| 24 | जवाहर योजनेअंतर्गत तालुका निहाय विमुक्त जाती व भटक्या जमातीतील किती लाभार्थीसाठी विहिरी खोदण्यात आलेल्या आहेत ? सदर योजनेसाठी लाभार्थी निवडण्याचे निकष काय आहेत ? | सन 2010-11, 2011-12 व 2012-13 वर्षात जवाहर योजनेअंतर्गत विहिर मंजूरीचा लक्षांक नसल्याने विमुक्त जाती व भटक्या जमातीतील वा इतर लाभार्थ्यासाठी विहिरी मंजूर करण्यात आलेल्या नाहीत. |

# परिशिष्ट - तीन

# समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त



## पहिली बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर, २०१३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

३. श्री. पृथ्वीराज साठे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. जितेंद्र भोळे, उप सचिव

२. श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली :**

१) श्री. निलेश र. गटणे, अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली,

२) श्री. विकास र. ठाकरे, निवासी उप जिल्हाधिकारी,

३) श्री. पी. शिवशंकर, उप विभागीय अधिकारी,

४) श्री. टी. डी. बरगे, सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग, गडचिरोली,

५) श्री. रामचंद्र गोटा, जिल्हा माहिती अधिकारी,

६) श्री. एस. पी. पडघन, कृषी अधिकारी,

७) श्रीमती वंदना सवरंगपते, तहसीलदार, गडचिरोली,

८) श्री. सी.जी. पिन्तुलवार, नायब तहसीलदार.

**सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, नागपूर :**

१) श्री. के. एन. के. राव, सहायक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष)

२) श्री. एस. आर. थांगरे, नियोजन अधिकारी

सदर बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांशी चर्चा केली.

## दुसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक १० जून २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीस खालील सन्मानीय सदस्य उपस्थित होते:—

**उपस्थिती :**

१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

४) श्री. महेश चौघुले, वि.स.स.

५) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

७) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

८) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

९) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

**विभागीय प्रतिनिधी :**

१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग.

२) श्री. उज्वल ऊके, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

३) श्री. प्रमोद नलावडे, सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग (मा.व.क.),

४) श्री. रणजित कुमार, जिल्हाधिकारी, गडचिरोली,

५) श्री. व्ही. डी. गुजर, उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

सदर बैठकीत समितीने प्रधान सचिव, महसूल विभाग, सामाजिक न्याय विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मा.व.क.) व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.



## तिसरी बैठक

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची बैठक गुरुवार, दिनांक २३ जुलै २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१) श्री. बाळासाहेब सानप, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

३) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

४) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

५) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

६) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.

७) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

८) श्री. भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर, वि.स.स.

९) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

१०) श्री. रामराव वडकुते, वि.प.स.

११) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.

१२) श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

२. श्री. राजेश तारवी, उप सचिव,

३. श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारुप अहवालावर विचार करून काही दुरुस्त्यांसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई